महाराष्ट्र पोलीस

**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०२/०४/२०१८

# चांदशी शिवारात हॉटेल शॅक येथील हुक्का पार्लरवर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा छापा

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेशान्वये जिल्हयातील अवैध धंद्यांवर धडक कारवाई सुरू आहे. अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने दिनांक ०१ एप्रिल २०१८ रोजी चांदशी शिवारातील हॉटेल शॅक येथे अवैधरित्या सुरू असलेले हुक्का पार्लरवर अचानक छापा टाकला.

नाशिक शहरालगत चांदशी गावचे शिवारातील हॉटेल शॅक येथे अवैधरित्या हुक्का पार्लर सुरू असुन, काही युवक-युवती सर्रासपणे मद्यपान / धुम्रपान करत असलेबाबत गोपनीयरित्या माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाने हॉटेल शॅक येथे दिनांक ०१ एप्रिल २०१८ रोजी रात्रीचे सुमारास अचानक छापा टाकला. सदर हॉटेलचे लॉन्स व झोपडयांमध्ये काही युवक हुक्का ओढुन नाका तोंडातुन धुर सोडत असतांना मिळुन आले. तसेच **हॉटेलचे मॅनेजर प्रविण रंगनाथ दराडे, वय ३२, रा. हिरावाडी, पंचवटी, नाशिक** याने स्मोकिंग झोन व्यतिरिक्त सार्वजनिक जेवणाचे ठिकाणावर विविध फ्लेवरचा हुक्का उपलब्ध करून देवुन खाद्यपदार्थ व पाणी पुरविले बाबत त्याचेविरुध्द **सिगारेट अ‍ॅण्ड टोबॅको प्रोडक्ट अ‍ॅक्ट सन २०१३ चे कलम ४,२१ प्रमाणे कारवाई** करण्यात आली आहे. सदर छाप्यात हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य साधने, हुक्क्याचे विविध फ्लेवरचे पदार्थ असा एकुण ७,२८५/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

चांदशी गावातील हॉटेल शॅक हे नाशिक शहरातील महात्मानगर येथील रहिवासी शिवराज वावरे यांचे मालकीचे असुन सदर हॉटेलमध्ये हुक्का पार्लरच्या नावे जागोजागी युवक-युवती एकत्र येवुन मद्यपान-धुम्रपान करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सर्वच स्तरातुन असे प्रकार बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने हॉटेल शॅक येथे अवैधरित्या सुरू असलेले हुक्का पार्लरवर कारवाई केली असुन आगामी काळात सतत कारवाई सुरू राहणार आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयात अशा प्रकारचे कोणतेही अवैध धंदे सुरू असल्यास स्थानिक गुन्हे शाखेचे दुरध्वनी क्र. ०२५३-२३०९७१० यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोनि आशिष आडसुळ, सपोउनि रामभाउ मुंढे, पोना जालिंदर खराटे, पोकॉ लहु भावनाथ, इम्रान पटेल अशांचे पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन कारवाई केली आहे.